# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 May 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०५ मे २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीची माहिती जाणून घेण्यासाठी ७५ आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचा भारत दौरा
- भारतीय जनता पक्षाने जाहिरातीच्या माध्यमातून आचारसंहितेचा भंग केल्याची काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे तक्रार
- तिसऱ्या टप्प्यातील निवडणूक प्रचार आज संपला, मराठवाड्यातल्या लातूर, उस्मानाबादसह राज्यातल्या ११ मतदारसंघाचा समावेश

आणि

- राज्यात उष्णतेची लाट कायम, पुढील दोन दिवसांत मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता

****

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज नवी दिल्लीत ७५ आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींना लोकसभा निवडणूकीच्या विविध पैलूंची माहिती दिली. लोकशाहीच्या या महापर्वाचं निरिक्षण करण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे या प्रतिनिधिंना आमंत्रित करण्यात आलं आहे. हे प्रतिनिधी महाराष्ट्रासह गोवा,गुजरात,कर्नाटक, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशातील विविध मतदारसंघांचा दौरा करणार आहेत. नऊ मे पर्यंत हा दौरा असणार आहे.

****

भारतीय जनता पक्षाने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिराती विरोधात काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने आज तक्रार दाखल केली आहे. आचारसंहितेचा भंग करत धार्मिक

मुद्यावर आधारित जाहिरात दिल्याने भाजप आणि त्यांचे सहकारी मित्र अजित पवार गट आणि शिवसेनेचा शिंदे गट यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केल्याची काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली. यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे आम्ही पुरावे दिले आहेत त्यामुळे भाजप, अजित पवार गट आणि शिंदे गटाच्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करावी अशी मागणीही राज्याच्या निवडणूक अधिकाऱ्याकंडे केल्याचं लोंढे यांनी सांगितलं.

****

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचा प्रचार आज संपणार आहे. या टप्प्यात मराठवाड्यातल्या लातूर आणि उस्मानाबाद लोकसभा मतदार संघांसह राज्यातल्या रायगड, बारामती, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी–सिंधुदूर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या ११ मतदार संघांचा समावेश आहे. या सर्व मतदार संघांमध्ये महाविकास आघाडी तसंच महायुतीसह विविध पक्षांच्या उमेदवारांसाठी विविध राजकीय पक्षांचे नेते सभा, मेळावे, प्रचार फेऱ्या तसंच मतदारांशी गाठी भेटी घेत आहेत.

****

लातूर लोकसभा मतदारसंघात आज अहमदपूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. तर, काँग्रेस नेते अमित देशमख यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ देखील सभा आयोजित करण्यात आली होती. तिसऱ्या टप्प्यातील ०७ मे रोजी होणाऱ्या मतदानासाठीचा प्रचार आज संपला. लातूर या अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या लोकसभा मतदारसंघातही आज सर्वच राजकीय पक्ष तसेच अपक्ष उमेदवारांनी मतदारानाच्या गाठीभेटीवर जोर दिल्याचं पहायला मिळालं. लातूर लोकसभा मतदारसंघात भाजप नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, नितीन गडकरी, काँगेस नेत्या प्रियंका गांधी, शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, वंचित आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यासह सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सभा घेतल्या. राजकीय पक्षाच्या नेत्यांनी उमेदवारांनी मतदारसंघातील विविध भागात रॅली काढून, बैठका घेऊन तसेच प्रत्यक्ष भेटून मतदारांना साद घातली.

****

बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणाऱ्या २३० बीड विधानसभा मतदारसंघात दि.६, १०, ११ आणि १२ मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार आहे. बीड लोकसभा मतदारसंघात शासकीय सेवेत असलेल्या मतदारांना ६, १० आणि ११ मे रोजी तहसील कार्यालयात पोस्टल मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

****

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात निवडणूक विभागानं गृह मतदानाची प्रक्रिया सुरु केली आहे. यात, आतापर्यंत एकूण १ हजार ५७९ जणांनी मतदान केलं आहे. ही प्रक्रिया अजूनही सुरू असून उद्या सहा मे पर्यंत ती सुरु राहणार आहे,अशी माहिती निवडणूक विभागामार्फत देण्यात आली आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी यावर्षी पहिल्यांदाच ८५ वर्षांवरचे ज्येष्ठ नागरिक मतदार तसंच दिव्यांग, अत्यावश्यक सेवेतील अधिकारी-कर्मचारी आणि निवडणूक कर्तव्यावर असणारे अधिकारी कर्मचारी असे मिळून आतापर्यंत ४ हजार ७२ जणांनी मतपत्रिकेद्वारे मतदान केलं आहे, अशी माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.

****

कामगारांना मतदानाचा हक्क योग्य रीतीनं बजावता यावा, यासाठी सर्व क्षेत्रातील कामगारांना मतदानाच्या दिवशी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत राज्य शासनानं परिपत्रक जारी केलं आहे. लातूर लोकसभा मतदारसंघात सात मे रोजी होणाऱ्या मतदानासाठी, मतदान क्षेत्रातील कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना भरपगारी सुट्टी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसल्यास सुट्टी ऐवजी केवळ दोन तासांची सवलत देखील देण्यात येणार आहे. मतदान करण्यास सवलत मिळाली नाही, अशी तक्रार दाखल झाल्यास संबंधिताविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगानं धुळे मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी गृहभेटी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमातंर्गत आज धुळे तालुक्यातील वडगाव इथं निवडणूक अधिकारी, कर्मचारी गृहभेट देऊन मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित केलं. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी

गृहभेटी उपक्रम राबविण्याबाबत सूचना दिल्या होत्या, त्यानुसार जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ३७५ मतदान केंद्रांवर ४७ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं लोकसभा निवडणूक चौथ्या टप्प्यात होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलीस दलानं शहरातल्या रोशन गेट, शहागंज, सिटी चौक परिसरात आज सकाळी संचालन केलं.

****

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय संचार ब्यूरो द्वारा तसेच जिल्हा प्रशासन, जिल्हा माहिती कार्यालय आणि दक्षिण मध्य रेल्वे यांच्या सहयोगाने छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक इथं सोमवार दि. ६ ते बुधवार दि.८ मे दरम्यान मतदार जनजागृतीसाठी तीन दिवसीय चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. सोमवार दि.६ मे रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते या चित्रप्रदर्शनाचा प्रारंभ होणार आहे. सोमवार दि.६ ते बुधवार दि.८ या कालावधीत सकाळी ९ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी हे प्रदर्शन मोफत खुले राहणार आहे.

****

बीड जिल्ह्यात केज तालुक्यात दोन कोटींचे चंदन आज जप्त करण्यात आलं आहे. केज पोलीस ठाण्याच्या हद्दीत आज पहाटे ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी १२०० किलो चंदन जप्त करण्यात आलं असून दोघांना ताब्यात घेतलं आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू असून याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बीड पोलीस प्रशासन सतर्क असून अवैध धंद्यावर कारवाई करणे सुरू आहे.

****

मराठवाड्यासह राज्यात उष्णतेची लाट कायम आहे. कमाल तापमानात वाढ दिसून येत आहे. परभणी इथं ४३ पूर्णांक सहा, नांदेड ४३ पूर्णांक २, बीड ४३ पूर्णांक एक, छत्रपती संभाजीनगरचं तापमान ४१ पूर्णांक सहा एवढं नोंदवलं गेलं.

वाढत्या तापमानामुळे नांदेड शहरात चारचाकी वाहनानं पेट घेतल्याची घटना घडली. दरम्यान, मराठवाड्यातील नांदेड आणि लातूर जिल्ह्यात सोमवार आणि

मंगळवारी तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडासह पावसाची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे.

****

अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वतंत्र उष्माघात कक्ष तयार करण्यात आला आहे. तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून नागरिकांना त्वरित उपचार मिळावेत यासाठी जिल्हा रुग्णालय प्रशासनानं हा निर्णय घेतला आहे. नागरिकांनी जास्त तापमानात बाहेर पडू नये, भरपूर पाणी प्यावं, आवश्यक काम पडल्यास संपूर्ण डोक्याला कपडा बांधूनच घराच्या बाहेर पडावं असं आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मुदखेड तालुक्यातल्या पारडीहून देगलूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर टेम्पो उलटल्याने आज सकाळी अपघात झाला. पारडी इथून सकाळी दहाच्या सुमारास वऱ्हाडी मंडळीला घेऊन हा टेम्पो निघाला होता. नांदेड – देगलूर रस्त्यावरील किन्हाळा गावालगत टेम्पो आला असता चालकाचं नियंत्रण सुटल्याने टेम्पो उलटला. या अपघातात १५ जण जखमी झाले असून त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना नायगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

****

बुलढाणा जिल्ह्यामध्ये मेहकर नजीक समृद्धी महामार्गावर आज सकाळी एका कार अपघातात दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये कारला मागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने धडक दिल्याने हा अपघात झाला असून रुग्णांना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आमच्या वार्ताहराने दिली आहे.

****

अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक क्षितीज झारापकर यांचं आज सकाळी निधन झालं. ते ५४ वर्षांचे होते. दादर स्मशानातभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात होणार आहेत. क्षितीज झारापकर यांनी गोळाबेरीज, ठेंगा, एकुलती एक, आयडियाची कल्पना आदी चित्रपटांतून भूमिका केल्या होत्या.

****